* मुख्य संपादक *
सुग्रीव सोपानराव मुंडे
* आवृत्ती संपादक *
लक्ष्मीकांत नामदेवराव मुंडे

निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र
# आत्ताच एक्सप्रेस
* नांदेड * परभणी * हिंगोली

E-Paper :
www. attachexpress.in
Post Regd.No.
LII/PBN/RNP-183/20021-22

* वर्ष १० वे * अंक २९३ * किंमत - २ रु | RNI.No. MAH/MAR2014/56289 | * गुरूवार दि.२६ फेब्रुवारी २०२६ | * पाने-४

## सहस्रकुंड धबधबा विकासासाठी ४३ कोटींचा भव्य आराखडा; पर्यटनाला नवे पंख, स्थानिकांना रोजगाराची सुवर्णसंधी

* आत्ताच एक्सप्रेस
लक्ष्मीकांत मुंडे

**किनवट** – किनवट तालुक्यातील विदर्भ–मराठवाडा सीमेलगत वसलेले सुप्रसिद्ध सहस्रकुंड धबधबा पर्यटन स्थळ आता राज्याच्या पर्यटन नकाशावर अधिक ठळकपणे झळकण्याच्या मार्गावर आहे. या नैसर्गिक संपदेच्या सर्वांगीण विकासासाठी प्रस्तावित तब्बल ४३ कोटी रुपयांच्या महत्त्वाकांक्षी आराखड्याची प्रत्यक्ष पाहणी मुख्यमंत्री कार्यालयातील उपसचिव राजेंद्र खंदारे यांनी स्थळभेट देऊन केली. पाहणीदरम्यान भूमी अभिलेख विभागाला मोजमाप, जागेची नोंदणी व प्रशासकीय प्रक्रिया जलदगतीने पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव श्रीकर परदेशी यांच्या मार्गदर्शनाखाली तयार होत असलेला हा विकास आराखडा पर्यटनवाढ, स्थानिक युवकांना रोजगारनिर्मिती आणि शासनाच्या महसुलात वाढ या त्रिसूत्री उद्दिष्टांवर आधारित आहे.

प्रस्तावित आराखड्यानुसार सहस्रकुंड परिसराचा पर्यटनदृष्ट्या कायापालट करण्यासाठी सुशोभित उद्यान, पर्यटकांसाठी सुसज्ज रेस्ट हाऊस, धबधब्याचा अनुभव देणारे आधुनिक एमपी थिएटर, लहान मुलांसाठी मिनी ट्रेन, स्थानिकांना रोजगार उपलब्ध करून देणारे शॉपिंग कॉम्प्लेक्स, पिण्याच्या पाण्याची टाकी, परिसर सुशोभीकरणासाठी डेकोरेटिव्ह लाईट पोल, मोठ्या प्रमाणावर पर्यटकांना सामावणारी विस्तृत पार्किंग व्यवस्था, पर्यावरणपूरक सौरऊर्जा प्रकल्प तसेच मंदिर ते मुख्य प्रवेशद्वारापर्यंत रुंद व दर्जेदार रस्त्याचे बांधकाम करण्यात येणार आहे.

दरम्यान, पैनगंगा नदीवरील परोटी तांडा येथे मृद व जलसंधारण विभागामार्फत उभारण्यात येणाऱ्या बंधाऱ्यामुळे तयार होणारे बॅकवॉटर सहस्रकुंडपर्यंत पोहोचणार असून नदी वर्षभर जलयुक्त राहण्यास मदत होणार आहे. त्यामुळे भविष्यात पर्यटकांसाठी बोटिंगची सुविधा सुरू करण्याचाही मार्ग मोकळा होईल. या कामांवर कार्यकारी अभियंता कांबळे यांचे नियंत्रण राहणार आहे. सदर विकासकामांसाठी महसुली जागेवर स्वतंत्र गट क्रमांक निर्माण करून प्रकल्पाची अंमलबजावणी केली जाणार आहे. पाहणीवेळी तहसीलदार डॉ. शारदा चौंडेकर, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता व्ही. पी. झरीकर, स.पो.नि. उमेश भोसले, वनपरिक्षेत्र अधिकारी सचिन धनगे, सहस्रकुंड बाणगंगा ट्रस्टचे सचिव सतीश वाळकीकर, मंडळ अधिकारी सचिन भालेराव, वनपाल व्ही. एस. गुद्दे, वनरक्षक अकबर सय्यद व कृष्णा राठोड, तलाठी जाधव, भूमी अभिलेख अधिकारी मुनेश्वर व तोंडावर, पोलीस पाटील शिवराम जाधव व रवी खोकले तसेच पत्रकार परमेश्वर पेशवे, मारोती शेळके, गौतम कांबळे आणि ईश्वर जाधव उपस्थित होते. या प्रकल्पाला आमदार भीमराव केराम यांनी सहमती दर्शवत सक्रिय पाठिंबा दिला आहे.

सहस्रकुंड धबधबा हा आधीच निसर्गप्रेमी व पर्यटकांचे आकर्षण केंद्र असून प्रस्तावित विकासामुळे येथे पर्यटकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. स्थानिक युवकांसाठी रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होतील, लघुउद्योगांना चालना मिळेल आणि संपूर्ण परिसराच्या आर्थिक विकासाला गती मिळेल. या भव्य विकास आराखड्यामुळे सहस्रकुंड पर्यटन स्थळाचा कायापालट होऊन किनवट तालुका राज्यातील प्रमुख पर्यटन केंद्र म्हणून उदयास येईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.



## डोनाल्ड ट्रम्प यांचा धडाका सुरुच, भारताच्या सौर उत्पादनांच्या आयातीवर तब्बल १२६ टक्के टॅरिफ

आत्ताच एक्सप्रेस

**नवी दिल्ली** - मेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना सुप्रीम कोर्टात टॅरिफच्या मुद्यावर अपयश आल्यानंतर ते कमालीचे आक्रमक झाले आहेत. अमेरिकन सुप्रीम कोर्टानं डोनाल्ड ट्रम्प यांचा टॅरिफचा निर्णय बेकायदेशीर ठरवला होता. यानंतर ट्रम्प यांनी पहिल्यांदा सर्व देशांवर १० टक्के टॅरिफ लागू करत असल्याची घोषणा केली. यानंतर पुढे जात ट्रम्प यांनी ते १० वरुन १५ टक्क्यांपर्यंत वाढवलं. आता अमेरिकेनं भारत, इंडोनेशिया आणि लाओस या सारख्या देशांमधील सौर उत्पादनांच्या आयातीवर मोठ्या प्रमाणात टॅरिफ लावलं आहे. अमेरिकेनं भारतीय सौर उत्पादनांवर १२६ टक्के टॅरिफ लादलं आहे. यामुळं या निर्णयाचा परिणाम सौर ऊर्जा क्षेत्रातील कंपन्यांवर झाला आहे.

ब्लूमबर्गच्या रिपोर्टनुसार अमेरिकेच्या वाणिज्य विभागानं भारतातून आयात केल्या जाणाऱ्या सौर उत्पादनांच्या आयातीवर १२६ टक्के टॅरिफ लादण्याची घोषणा केली आहे. इंडोनेशियासाठी हे शुल्क ८६ टक्के १४३ टक्क्यांदरम्यान असेल. लाओस साठी हे शुल्क ८१ टक्के निर्धारीत करण्यात आलं आहे. आयात शुल्काचे दर विदेशातील सब्सिडी लक्षात घेत तयार करण्यात आली आहेत. अमेरिकेच्या मते या देशातील निर्यातदार अमेरिकेमधील देशांतर्गत सौर ऊर्जा उत्पादकांच्या तुलनेत कमी किमतीवर उत्पादन निर्यात करण्यास परवानगी मिळते. ट्रम्प यांच्या प्रशासनाकडून अधिक टॅरिफ लावण्याचं कारण म्हणजे देशांतर्गत सौर ऊर्जा उत्पादकांना अधिक लाभ पोहोचवणं आहे.

अमेरिकेकडून भारतीय सौर उत्पादनांवर १२६ टक्के टॅरिफ लादण्यात आल्यानं भारतीय निर्यातीवर परिणाम होईल. या कंपन्यांच्या शेअरमध्ये घसरण पाहायला मिळू शकते. वाणिज्य मंत्रालयाची आकडेवारी पाहिली असता २०२४ मध्ये भारतानं अमेरिकेला ७९२.६ दशलक्ष डॉलरची निर्यात केली होती. गेल्या काही दशकांमध्ये भारताची सौर ऊर्जा निर्यात वाढली होती. ट्रम्प यांनी ज्या तीन देशांना टारगेट केलेलं आहे त्या देशांकडून अमेरिकेनं ४.५ अब्ज डॉलर्सची सौर उत्पादनांची आयात केली होती.

रिपोर्टनुसार २०२५ च्या पहिल्या सहा महिन्यात अमेरिकन सौर ऊर्जा उत्पादनांच्या एकूण आयातीपैकी ५७ टक्के आयात भारत, इंडोनेशिया आणि लाओसमधून केली होती. यामुळं डोनाल्ड ट्रम्प यांनी या तीन देशांवर टॅरिफ लादण्याचा घेतलेला निर्णय धक्कादायक मानला जात आहे.

## बारामती मतदारसंघाची पोट निवडणूक सुनेत्रा पवारच लढणार, राष्ट्रवादी काँग्रेसच्या कोअर कमिटीच्या बैठकीत निर्णय

जनसंजीवनी वृत्तसेवा

**बारामती** - राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनामुळे रिक्त झालेल्या बारामती विधानसभा पोटनिवडणुकीची तयारी निवडणूक आयोगाने सुरू केली आहे. या विधानसभा मतदारसंघासाठी विशेष संक्षिप्त मतदारयादी पुनरीक्षण कार्यक्रम आयोगाने जाहीर केला असून १ जानेवारी २०२६पर्यंत नाव नोंदविलेले मतदार पोटनिवडणुकीत मतदान करू शकणार आहेत. या मतदारसंघासाठी १० मार्चला अंतिम मतदारयादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. तर बारामती विधानसभेच्या पोटनिवडणुकीचा उमेदवार ठरला असल्याची माहिती समोर आली आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार बारामती पोटनिवडणूक लढणार असल्याची माहिती आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कोअर कमिटीच्या बैठकीत पोटनिवडणूक लढण्यावर एकमत झाले आहे. बारामती विधानसभेची प्रारूप मतदार यादी १० मार्चला प्रसिद्ध झाल्यानंतर कोणत्याही क्षणी निवडणुकीची घोषणा होणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा निवडणूक बिनविरोध करण्यावर भर असणार आहे.



आगामी राज्यसभा निवडणुकीत पार्थ पवार हे राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार असतील, असा निर्णय पक्षाकडून घेण्यात आल्याची माहिती आहे. सोमवारी रात्री मुंबईत राष्ट्रवादी काँग्रेसच्या झालेल्या पक्षाच्या कोअर कमिटीच्या बैठकीत हा निर्णय झाल्याची माहिती आहे. सुनेत्रा पवार यांच्या उपस्थितीत झालेल्या कोअर कमिटीच्या बैठकीत पार्थ पवार यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले. प्रफुल पटेल यांच्या मुंबईतील निवासस्थानी ही बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्यासह कोअर कमिटीचे सदस्य उपस्थित होते.

तसेच २६ फेब्रुवारीला होणाऱ्या राष्ट्रीय अध्यक्ष निवडीसंदर्भात आयोजित केल्या जाणाऱ्या राष्ट्रीय कार्यकारिणी बैठक तयारी विषयी या बैठकीत चर्चा झाल्याचे समजते. येत्या काही दिवसांमध्ये वरळी डोम येथे राष्ट्रीय कार्यकारिणीची बैठक होणार आहे. जिथे सुनेत्रा पवार यांच्या नावावर राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून शिक्कामोर्तब केले जाणार आहे.

## गर्भलिंग निदान रोखण्यासाठी कायद्यात सुधारणा होणार–आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर

आत्ताच एक्सप्रेस

**मुंबई** – राज्यातील गर्भ लिंग निधान चिंताजनक आहे. राज्य सरकारने ही चाचणी रोखण्यासाठी प्रभावी अंमलबजावणी केली. तरीही राज्यात हे लिंग निदान होत असल्याने महाराष्ट्र प्रसूती पूर्व विधान तंत्रज्ञान वापर कायदा १९८८ मध्ये काही सुधारणा करून कठोर शिक्षेची तरतूद करण्याचा प्रस्ताव तयार केला जाईल, असे स्पष्ट आश्वासन आरोग्य मंत्री प्रकाश आंबेडकर यांनी दिली. महिलांच्या मासिक पाळीच्या काळात रजा देण्याच्या संदर्भात विचार केला जाईल असेही आबिटकर यांनी सांगितले.

राज्यातील मुलींच्या जन्मदरात वाढ व्हावी, स्त्री भ्रूण हत्या रोखता यावी यासाठी सरकारने लेक लाडकी माझ्या कन्या भाग्यश्री, सुकन्या समृद्धी यासारख्या अनेक योजना लागू केलेले आहेत. तरीही राज्यातील मुलींचा जन्मदर घटला आहे. राज्यातील २४ जिल्ह्यात लेक नकोशी मानसिकता आहे. मुलगी म्हणजे ओझे, घराण्याची अप्रतिष्ठा या मानसिक जोखाड्यातून राज्यातील जनता अद्याप बाहेर पडलेली नाही. सरकारच्या सर्व योजना फसलेल्या आहेत. स्त्रीभ्रूणहत्या सुरू आहे. मुलींना पोटातच मारले जात आहे. सरकारची भूमिका स्त्रीविरोधी असल्याची चित्र आहे. राज्याची पारंपरिक अवमूल्यन झाले आहे. अशी घणाघाती टीका करत राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी गर्भ लिंग निधान विरोधात लक्षवेधी मांडली.

महिलांना मासिक पाळीच्या काळात रजा देण्या संदर्भात विचार केला जाईल असे आरोग्यमंत्री आबिटकर यांनी सांगितले. या लक्षवेधीच्या चर्चेत नितीन राऊत, ज्योती गायकवाड, तुझ्या राठोड, प्रशांत बंग या सदस्याने भाग घेतला. ६२७ केंद्रांवर कारवाई करण्यात आली आहे. त्यात १२९ जणांना शिक्षा झाली. गर्भ लिंग निदानच्या करणाऱ्या केंद्रांवर प्रभावीपणे कारवाई केली जात आहे. महिलांचा जन्मदर राज्यात ९१३ आहे. ही कारवाई केली जात असल्याने महिलांचे जन्मदर राज्यात वाढला आहे. काही जिल्ह्यात एक हजारापेक्षा जास्त आहे. ज्या जिल्ह्यात हा दर कमी आहे. तेथे तपासणी केली जाईल. राज्याची शेजारील राज्य मध्य प्रदेश, तेलंगना, कर्नाटक राज्यात हा कायदा नसल्याने त्या ठिकाणी जाऊन गर्भ लिंग निदान केले जात आहे. त्यावर लक्ष ठेवले जाईल असे आबिटकर यांनी सांगितले.

## राज्यात रोहयो मजुरांची संख्या घटली; राज्य सरकारने तिजोरीतून निधी द्यावा, विजय वडेट्टीवार यांची मागणी

आत्ताच एक्सप्रेस

**मुंबई** – राज्यातील ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचे (रोहयो) वाटोळे झाले आहे. थकीत निधीमुळे महाराष्ट्रातील ३ लाख १२ हजार कामे बंद पडली असून मजुरांच्या हाताला काम उरलेले नाही,असा आरोप काँग्रेस विधिमंडळ नेते पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी आज विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात केला.

गडचिरोली आणि चंद्रपूर जिल्ह्यांसह संपूर्ण राज्यात मजुरांची संख्या घटली आहे. नागपूर विभागात ९९२ कोटी रुपयांचा निधी थकीत आहे. केंद्र सरकार राज्याला पैसे देत नाही आणि राज्य सरकार स्वतःच्या तिजोरीतून पैसे खर्च करण्यास तयार नाही. यामुळे ग्रामीण भागातील गरीब आणि शेतकरी कुटुंबे अडचणीत आली आहे,अस वडेट्टीवार म्हणाले. या मजुरांनी आपल्या न्याय्य मागण्यांसाठी आंदोलन केले म्हणून २० वर्षांपासून काम करणाऱ्या रोजगार सेवकांना कामावरून काढून टाकले जात आहे. एकट्या चंद्रपूर जिल्ह्यात १९ लोकांना केवळ आंदोलनात सहभागी झाले म्हणून कामावरून कमी करण्यात आले, हा अन्यायकारक निर्णय आहे. ग्रामसभेने निवडून दिलेल्या रोजगार सेवकांना शासन कोणत्या अधिकारात कामावरून काढत आहे? असा प्रश्न वडेट्टीवार यांनी उपस्थित केला.

वडेट्टीवार यांच्या प्रश्नावर मंत्री भरत गोगावले यांनी सभागृहात स्पष्ट केले की, कोणत्याही रोजगार सेवकाला कामावरून कमी केले जाणार नाही. मागणीनुसार काम देण्याचे धोरण कायम राहील आणि कोणत्याही प्रकारचा भेदभाव केला जाणार नाही. तसेच केंद्र सरकारकडून निधी मिळवण्यासाठी पाठपुरावा सुरू असून ही योजना अधिक सक्षमपणे राबवली जाईल.सर्व मजुरांचे पैसे देखील दिले जातील असे आश्वासन मंत्र्यांनी सभागृहात दिले.

## किनवट प्रशासनावर नागरिकांचा संताप: शासकीय जमीन व गौण खनिज लुटीला ‘अधिकृत आश्रय’ मिळाल्याचा आरोप

* आत्ताच एक्सप्रेस
लक्ष्मीकांत मुंडे

**किनवट** – किनवटच्या सहाय्यक जिल्हाधिकारी कार्यालय आणि तहसीलदार कार्यालयाच्या कार्यपद्धतीवर सध्या तीव्र प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. गौण खनिजांच्या अवैध उत्खननाला आळा घालणे, परमपोक व शासकीय जमिनींचे संरक्षण करणे आणि सर्वसामान्यांना न्याय देणे ही जबाबदारी ज्या प्रशासनावर आहे, तीच कार्यालये आता वाळू–मुरुम माफिया व शासकीय जमीन गिळंकृत करणाऱ्यांसाठी “सुरक्षित आश्रयस्थान” बनत असल्याच्या संतप्त प्रतिक्रिया जनतेतून उमटत आहेत.

तहसील व उपविभागीय कार्यालयात अनेक वर्षे टेबल बदलत ठाण मांडून बसलेल्या कर्मचाऱ्यांची तात्काळ बदली करून त्यांच्या कार्यकाळातील प्रकरणांची चौकशी झाली नाही, तर प्रशासनावर आलेली मरगळ दूर होणार नाही, असा ठाम सूर नागरिक व्यक्त करत आहेत.

**धृतराष्ट्रालाही लाजवेल अशी प्रशासनाची भूमिका?**

गट क्रमांक ५५ या शासकीय जमिनीच्या घोटाळ्यात कागदोपत्री हेराफेरी स्पष्ट दिसत असतानाही कारवाईला विलंब होत आहे. कोठारी येथील गायरान व परमपोक जमिनींबाबत पुराव्यानिशी तक्रारी दिल्यानंतरही तातडीने निर्णय घेतला जात नाही. वारसा वाटणी व फेरफार प्रकरणे वर्षानुवर्षे प्रलंबित ठेवली जातात. दोन महिला तलाठ्यांना



लाच घेताना रंगेहात पकडले गेले तरी प्रणालीत सुधारणा झाल्याचे चित्र दिसत नाही.

गौण खनिजांचे अमर्याद अवैध उत्खनन करून पर्यावरणाचा समतोल बिघडवणाऱ्यांवर कायमस्वरूपी लगाम लावण्यात प्रशासन अपयशी ठरत असल्याचा आरोप आहे. सुज्ञ नागरिकांनी पुराव्यासह तक्रारी केल्यानंतरही अधिकाऱ्यांनी ठोस भूमिका घेतल्याचे दिसत नाही.

**फाईल्सचा ‘वनवास’ तक्रारदारांची वणवण**

शासनाची मालमत्ता सुरक्षित राहावी आणि पर्यावरणाचा ऱ्हास थांबावा म्हणून नागरिक निवेदने देतात; मात्र त्या फाईल्स प्रशासनाच्या अशा कोपऱ्यात ढकलल्या जातात जिथे निर्णयक्षमता पोहोचतच नाही, अशी टीका होत आहे. न्यायाच्या अपेक्षेने येणाऱ्या नागरिकांना “तारीख पे तारीख” दिली जाते. साधी पोहोच पावती मिळवण्यासाठीही नागरिकांना वारंवार चकरा माराव्या लागत आहेत.

**मुरुम परवानग्यांचा गैरवापर?**

भोकरइस्लापूरकिनवट राष्ट्रीय महामार्गालगत सावरी परिसरातील नवीन रस्त्याच्या कामासाठी दिलेल्या निशुल्क मुरुम परवानगीचे उल्लंघन झाल्याची तक्रार आहे. शनिवारपेठ येथील मोफत मुरुम प्रधानसांगवी जवळ उभारल्या जाणाऱ्या टोल नाक्याच्या कामासाठी वळविल्याचा आरोप करण्यात येतो. शेततळ्याच्या नावाखाली कंपन्यांना दिलेल्या मुरुम परवानगीचा विपर्यास झाल्याचेही सांगितले जाते. या सर्व बाबींवर निवेदने देऊनही कोणती कारवाई झाली याची माहिती आजपर्यंत उपलब्ध नाही.

**समन्वयाचा अभाव ढकलाढकलीची प्रशासनशैली**

तहसील आणि उपविभागीय प्रशासनात समन्वयाचा पूर्ण अभाव असल्याचे चित्र दिसते. एकमेकांवर जबाबदारी ढकलत प्रकरणे संभ्रमावस्थेत ठेवली जात असून नागरिकांचा विश्वास डळमळीत होत आहे.

प्रशासनाने तात्काळ कारवाई करून शासकीय जमीन, नैसर्गिक संपत्ती आणि नागरिकांचा विश्वास वाचवावा, अन्यथा तीव्र लोकआंदोलन उभे राहू शकते, असा इशारा नागरिकांतून दिला जात आहे.

निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र
आत्ताच एक्सप्रेस


# एक किलोमीटरचे कुंपण

शिक्षण हक्क कायद्यातील २५ टक्के आरक्षणाच्या धोरणाच्या नियमावलीनुसार फक्त एक किलोमीटर अंतरातील शाळाच विद्यार्थ्यांना निवडता येईल. ही तरतूद शिक्षण हक्क कायद्याच्या मूळ तत्त्वालाच हरताळ फासणारी आहे. शिक्षण हक्क कायद्यातील २५ टक्के आरक्षणाची तरतूद सामाजिक विषमता संपवण्यासाठी एक मिशन म्हणून राबवली पाहिजे, असे आग्रही प्रतिपादन वरील शब्दांत नुकतेच सर्वोच्च न्यायालयातील न्यायमूर्तींनी व्यक्त केले आणि त्यानंतर लगेच महाराष्ट्रात शिक्षण हक्क कायद्यातील २५ टक्के आरक्षणाच्या धोरणाची नियमावली नुकतीच जाहीर झाली. राज्यातील ८६५० स्वयंअर्थसहाय्यित व विनाअनुदानित खासगी शाळांमध्ये एकूण १ लाख १२ हजार ७०६ जागांसाठी ही नियमावली यावर्षी वादात सापडली आहे. आता फक्त एक किलोमीटर अंतरातील शाळाच विद्यार्थ्यांना निवडता येणार आहे व जर एक किलोमीटरमधील शाळेत नंबर लागला नाही किंवा एक किलोमीटरमध्ये शाळा नसेल तर तीन किलोमीटर, पाच किलोमीटरच्या शाळांमध्ये संधी असणार नाही. अशा प्रकारचे एक किलोमीटरचे बंधन टाकणे हेच मुळात ही तरतूद ज्यातून आली, त्या तत्त्वाशी विसंगत आहे. शिक्षण हक्क कायद्यात ही तरतूद येण्याची काही कारणे होती. काही देशांत एज्युकेशन व्हाउचर विद्यार्थ्यांना दिले जाते, सरकार एका विद्यार्थ्यावर जितकी रक्कम खर्च करते ती रक्कम शाळांना देण्यापेक्षा पालकांच्या हातात कूपन स्वरूपात द्यायची व पालकांनी पाहिजे त्या शाळेमध्ये प्रवेश घ्यायचा, अशी ही कल्पना राबवली गेली. ती प्रायोगिक तत्त्वावर भारतात राबवावी, याबाबत अनेकदा चर्चा झाल्या. दिल्लीत सेंटर फॉर सिव्हिल सोसायटी ही संस्था या कल्पनेच्या प्रसारासाठी अनेक वर्षे काम करते. त्यांनी दिल्लीतील काही शाळांमध्ये अशा प्रकारचे व्हाउचर वाटपही केले होते. अकराव्या पंचवार्षिक योजनेत सरकारने प्रायोगिक तत्त्वावर अंमलबजावणी करण्याची सूचनाही केलेली होती, त्यातून ही कल्पना आली. जर श्रीमंतांना हवी ती शाळा निवडता येते तर गरिबांनाही ती संधी असली पाहिजे, हे मुख्य त्यामागील तत्त्व आहे. त्यांना सरकारी शाळांमध्ये शिकवण्याची सक्ती नको. कोणतीही शाळा गरीब पालकांना निवडता आली पाहिजे, हे या योजनेचे सूत्र या योजनेत डावलले जाणार आहे. दुसरी भूमिका ही होती, की आज श्रीमंतांच्या शाळा आणि गरिबांच्या शाळा अशी विभागणी शिक्षणात निर्माण झाली आहे. कोठारी आयोगाने घराजवळच्या शाळेत प्रवेश घेण्याची भूमिका मांडून गरीब व श्रीमंत यांनी एकाच शाळेत शिकावे, असे मानले होते. दुर्दैवाने कोणत्याही सरकारांना ते करता आले नाही व मोठ्या प्रमाणात खासगी शाळांना परवानगी दिल्याने व आर्थिक स्तराप्रमाणे शाळांचे वर्गीकरण झाल्याने शिक्षणातच सामाजिक विषमता निर्माण झाली. तीच विषमता पुढे समाजात प्रतिबिंबित होते आहे. आता मागे फिरता येत नसल्यामुळे किमान श्रीमंतांच्या खासगी शाळांमध्ये सक्तीने २५ टक्के गरिबांची मुले शिकवायची, जेणेकरून श्रीमंत व गरीब मुले एकत्र शिकून सामाजिक विषमता काही प्रमाणात कमी होऊ शकेल, असाही दृष्टिकोन या धोरणामागे आहे. हा उपाय म्हणजे वरवरची मलमपट्टी आहे. वास्तविक सर्वांना घराजवळच्या शाळेत शिकण्याची सक्ती केली असती व स्तरीकरण केले नसते तर विषमता तयार झाली नसती, तरीही या धोरणामागची भूमिका स्वागतार्ह अशीच आहे. एक किलोमीटर अंतराचे कारण हे की ज्या तथाकथित प्रसिद्ध खासगी शाळा आहेत. या शाळांमध्ये प्रवेश मिळण्यासाठी किमान पाच किलोमीटरमधील पालक प्रयत्न करायचे व त्यांच्या जवळच्या शाळा असूनही तिथले प्रवेश मात्र होत नव्हते. त्यामुळे विशिष्ट शाळांसाठी गर्दी व इतर शाळा ओस, यामध्ये राज्यातील एकूण प्रवेश संख्या घटत होती, या बंधनामध्ये जवळच्या शाळेतच प्रवेश घेणे सक्तीचे असल्याने काही अंशी सर्वच खासगी शाळांमध्ये प्रवेश होतील, ही बाजू योग्य आहे. या बदलाचा सरकारी शाळांना काही प्रमाणात फायदा होईल, एक किलोमीटरमध्ये जर शाळा उपलब्ध नसेल किंवा त्या शाळेतील प्रवेश होऊन गेले तर उरलेल्या विद्यार्थ्यांना आजूबाजूच्या सरकारी शाळांमध्ये प्रवेश घ्यावाच लागेल. त्यामुळे काही अंशी सरकारी शाळांची पटसंख्या सावरायला मदत होईल. सरकारचा यामागचा खरा हेतू फी प्रतिपूर्ती रकमेचा बचत करण्याचा आहे. संस्थाचालकांना तीन हजार कोटींपेक्षा जास्त रक्कम द्यायची आहे. केंद्र सरकार त्यातील ६० टक्के वाटा देणार असले तरी राज्याने अगोदर ती दिली तरच वाटा देणार आहे. अशा वेळी एक किलोमीटर मधीलच शाळा निवडण्याचा कायदा बचतीला हितकारक ठरेल, इतका व्यावहारिक विचार आहे. वास्तविक सीएसआर फंडातून ही रक्कम उभी करावी किंवा इतर विद्यार्थ्यांच्या फीतून हे विद्यार्थी शिकवावेत. या योजनेप्रमाणे आदिवासी विद्यार्थी खासगी इंग्रजी शाळांमध्ये प्रवेश घेतात. त्यांची प्रतिविद्यार्थी ७०हजार रुपये फी आदिवासी विभाग आज भरतो, असे किमान दीड लाख लाभार्थी आहेत. धनगर विद्यार्थ्यांसाठीही अशीच योजना सुरू झाली आहे. या तिन्ही योजनांत इंग्रजी शाळा या दर्जेदार किंवा नामवंत आहेतच, हे गृहीतकच तपासून बघण्याची आवश्यकता आहे. या निमित्ताने एज्युकेशन व्हाउचर हा प्रयोग प्रायोगिक तत्त्वावर पंचवार्षिक योजनेने सुचवल्याप्रमाणे करून बघायला हवा. काही स्वयंअर्थसहाय्य शाळा, विनाअनुदान शाळेत व्हाउचर पद्धतीने यशस्विता तपासून बघायला हवी. या पद्धतीचे यश हे आहे, की आज पालकांच्या हातात शाळांचे कोणतेच नियंत्रण नाही; पण जर पालकांना जी शाळा योग्य वाटेल त्या शाळेमध्ये व्हाउचर द्यायचे, असे केले तर पालकांच्या हातात शक्ती येऊन पालकांचा शाळांवर अंकुश निर्माण व्हायला मदत होईल. अर्थात त्यासाठी समान दर्जाच्या अनेक शाळा आवश्यक असतील; अन्यथा शाळाच पालकांवर दादागिरी करतात हे आपण बघतो.

# 'अलिन' आशेचा एक दीप !



''केरळमधील दहा महिन्यांची अलिन वयाने सगळ्यात लहान असलेली डोनर आहे. आपलं मूल हे आईचं काळीज असतं. मुलीच्या निधनानंतर आपलं काळीज तुटलेलं असताना एका आईनं आपल्या मुलीचं काळीज काढून देणं, हे सुदृढ समाजाचं लक्षण आहे. देहदान व अवयवदान म्हणजे 'जिंदगी के बाद भी जिंदगी'. परंपरेतून प्रगतीकडे हे संस्थेचे ब्रीदवाक्य म्हणजे केवळ शब्द नसून संस्थेच्या कामाचा आत्मा आहे. भारतीय संस्कृतीमध्ये दान या संकल्पनेला सर्वोच्च स्थान आहे. आज दानाला आधुनिक विज्ञान आणि मानवतेची जोड देऊन आम्ही काम करत आहोत. आजही समाजात देहदानाबद्दल एक प्रकारचे मौन पाळलं जातं. भीती, अंधश्रद्धा आणि चुकीच्या समजुतीमुळे लोक मागे सरकतात. पण हे मौन तोडणं ही काळाची गरज आहे. नेत्रदान, अवयवदान, त्वचादान आणि देहदानातून आपण मृत्यूवर विजय मिळवू शकतो. दुसऱ्याच्या रूपाने जिवंत राहू शकतो.'' – पुरुषोत्तम पवार

ती जन्माला आली. टपोऱ्या डोळ्यांची... तिच्या हुंकाराने घरही बागडू लागलं. तान्हुली आईच्या मांडीवरून उतरून आता कुठे घरभर रांगू लागली होती. अलिन म्हणजे बहुधा आपणच असं तिला आतासं थोडं-थोडं कळू लागलं होतं. अलिन ही हाक ऐकताच खुदकन हसायची... रांगता रांगता थोडं धडपडत...पडत जमतंय का बुवा उभं राहायला... आपली आपणच ऊठ - बस करू लागली. तान्हुलीच्या या लीला पाहणं म्हणजे आमच्यासाठी एक सोहळाच होता.

अगदी दोनच महिन्यांवर येऊन ठेपलेला लेकीचा पहिला वाढदिवस कसा साजरा कारायचा याच्या चर्चा आताशा घरात थोड्या-थोड्या रंगू लागल्या होत्या. पण काळाचा एकच घाला आणि अलिन एखाद्या परीकथेतील परीसारखी आम्हाला प्रेमाचा स्पर्श करून कुठे तरी दूर अज्ञाताच्या वाटेवर निघून गेली. माझं मन मानतच नव्हतं... अलिन मला सोडून गेली. आई नजरेआड झाली की घरभर हुंकारत मला शोधणारी माझी तान्हुली माझ्याशिवाय एकटी कशी राहणार... अलिन आता या जगात नाही आहे हे सत्य कसं पटवू मनाला... कसं स्वीकारू मनाला वेदना देणारं हे वास्तव... माझी अलिन मृत नाहीच... मनात जपलेला तिचा पहिला हुंकार अजूनही ऐकू येतोय मला... अम्मा अम्मा अशी हाक मारायला मी तिला शिकवत असतानाची तिची ओठांची थरथर अजूनही नजरेसमोरून जात नाही आहे माझ्या... नि माझ्या छातीवर डोक ठेवून निवांत झोपलेल्या तान्हुलीच्या छातीचे ठोके अजूनही ऐकू येत आहेत मला... कसं स्वीकारू ती नाही आहे या जगात... नऊ महिने पोटात वाढवलेला, माझ्याच शरीराचा भाग असलेला हा केवळ मांसाचा गोळा नव्हता...

त्यात चैतन्य होतं माझ्या संस्कारांचं...

हे चैतन्य मला जपायचं आहे.

अलिन तर या जगात पार्थिव अर्थाने नाही, पण माझ्या गर्भात तयार झालेले तिचे इवले इवले अवयव मातीत मिसळू द्यायचे नाहीत मला... सचेतन करायचं आहे तिला... कोणत्या न कोणत्या रूपात रुजवायचं आहे माझ्या तान्हुलीला... ही कपोकल्पित वाटणारी कथा केवळ कपोकल्पित कथा नाही. असंच काहीसं घडलं असेल अवयवदान करणाऱ्या वयाने सगळ्यात लहान 'ऑर्गन डोनर' ठरलेल्या केरळमधील अलिनच्या घरात.

काळीज हेलावणारी ही बातमी वाचली. देहदान व अवयवदान चळवळीसाठी काम करणाऱ्या वसईतील पुरुषोत्तम पवार यांच्या स्टेटसवर. बोट आणि नजर तिथेच त्या बातमीवर थांबली... मनाला हेलावणारी बातमी होती, अवघ्या दहा महिन्यांच्या बाळाच्या देहदानाची. ही बातमी वाचताच काळजात कालवाकालव झाली. फक्त दहा महिन्यांचं गोंडस बाळ एका अपघातात जग सोडून निघून गेलं... पहिल्यांदा तर डोक्यात तिडीक गेली... काय हे, दिवसेंदिवस बेदरकारपणे वाहन चालवून दुसऱ्यांचे जीव घेणाऱ्या अपघातांची संख्या वाढतच चालली आहे. माणसाचं आयुष्य इतकं स्वस्त झालंय... किती असुरक्षित आयुष्य जगत आहोत आपण याची जाणीव अजूनच गडद झाली, पण पुन्हा विचार त्या दहा महिन्यांच्या बाळाच्या देहदानाच्या बातमीवरच येऊन थांबले. नेमकं काय झालं या बाळाचं, ही घटना घडल्यावर बाळाच्या आई-वडिलांचं नेमकं काय झालं असेल...

आपल्या पोटचा गोळा गमावल्यानंतर अतिशय वाईट मनः स्थितीत बाळाच्या देहदानाचा विधायक निर्णय, इतक्या तत्परतेने आई-वडिलांनी कसा घेतला असेल असे अनेक प्रश्न मनात आले आणि गुगलवर अधिक माहितीसाठी क्लिक केले.केरळमधील अलिन शेरीन अब्राहम या दहा महिन्यांच्या बाळाच्या देहदानाची ही बातमी. अलिन आपल्या आई-बाबांसोबत ज्या गाडीतून चालली होती, त्या गाडीला अपघात झाला. त्या अपघातात अलिनला प्रचंड दुखापत झाली. उपचारांसाठी ताबडतोब बाळाला जवळच्या इस्पितळात नेण्यात आले; परंतु दुर्दैव असे की बाळाच्या मेंदूला प्रचंड दुखापत झाल्याने बाळाला वाचवता आले नाही आणि डॉक्टरांनी बाळाला मृत घोषित केले. आपल्या बाळाच्या मृत्यूचे दुःख तिच्या आई-बाबांना किती झाले असेल याची कल्पनाही करवत नाही. पण त्याही परिस्थितीत बाळाच्या आई-वडिलांनी अतिशय धैर्याने निर्णय घेतला आणि तो म्हणजे बाळाच्या अवयवदानाचा.

डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली सन्मानपूर्वक अलिनचे अवयवदान करण्यात आले ज्यातून पाच जणांच्या आयुष्याला नवसंजीवनी मिळाली. अलिनची संपूर्ण बातमी वाचली आणि पहिला दंडवत केला तो अलिनच्या आई-वडिलांना. आपल्या डोळ्यांसमोर आपल्या बाळाचा मृत्यू पाहिलेल्या, दुःखात बुडालेल्या आई-वडिलांनी सहृदयतेने दाखवलेले धैर्य वंदनीय आहे. आपल्या वैयक्तिक दुःखाला बाजूला सारून घेतलेल्या निर्णयामुळे अलिन आज आशेचा किरण म्हणून संपूर्ण जगासमोर दातृत्वाचे एक उदाहरण ठरली आहे. जीवन हे नश्वर आहे, क्षणभंगुर आहे असे आपण नेहमी म्हणत असतो किंबहुना आजूबाजूला घडणाऱ्या घटनांमधून आपल्याला जीवनाच्या नश्वरतेची अनेकदा जाणीवही होत असते;

परंतु मातीत मिसळणाऱ्या या देहाला मरणानंतरही सन्मानपूर्वक सचेतन ठेवण्याचे एक माध्यम म्हणजे देहदान-अवयवदान. देहदान व अवयवदान चळवळीसाठी समर्पित भावनेने काम करणाऱ्या दि फेडरेशन ऑफ ऑर्गन अ‍ॅण्ड बॉडी डोनेशन या संस्थेचे संस्थापक व अध्यक्ष पुरुषोत्तम पवार यांच्याशी या विषयावर संवाद साधला. याविषयी ते म्हणाले, फेडरेशनच्या स्थापनेविषयी सांगताना पुरुषोत्तम पवार म्हणाले, ''लोकसंख्येच्या बाबतीत जगात प्रथम क्रमांकावर असलेला आपला भारत देश अवयवदानात तळाच्या क्रमांकावर आहे. ही खेदजनक वस्तुस्थिती दूर व्हावी या उद्देशाने देशात अनेक व्यक्ती, संस्था एकाकीपणे धडपड करत होत्या. अतोनात मेहनत करून देखील कार्याला हवे तसे यश मिळत नव्हते. कारण त्यांचे कार्य एकसंध नव्हते.

याकरिता देशभरातील संस्था व कार्यकर्त्यांना एका छताखाली आणण्यासाठी २०१५ मध्ये दि फेडरेशन ऑफ ऑर्गन अ‍ॅण्ड बॉडी डोनेशन या संस्थेची स्थापना करण्यात आली.'' पुरुषोत्तम पवार यांच्या संकल्पनेतून आणि प्रयत्नांमधून सुरू झालेल्या दि फेडरेशन ऑफ ऑर्गन अ‍ॅण्ड बॉडी डोनेशन या संस्थेच्या महाराष्ट्रात आता बारा जिल्हा शाखा कार्यरत असून १९ जिल्हा शाखांची बांधणी प्रगतिपथावर आहे.महाराष्ट्राबाहेर गोव्यात देखील फेडरेशन कार्यरत आहे. प्रशिक्षित कार्यकर्त्यांची फळी अवयवदान, देहदानाबद्दल जनजागृती, समुपदेशन, कायदेशीर मदत, अवयवदान व देहदानाची प्रक्रिया अशा विविध पातळ्यांवर निष्ठेने कार्य करत आहे.

माणसाचं अस्तित्व म्हणजे तरी काय? हा प्रश्न अनेकदा प्रत्येकाला पडतो. आपण आता श्वास घेत आहोत तोपर्यंत आपलं अस्तित्व. जसं बहिणाबाई म्हणते, 'आला सास, गेला सास, जिवा तुझं रे तंतर, अरे जगणं मरण एका सासाचं अंतर '... बहिणाबाईंच्या या ओळी मानवी जीवन नश्वर आहे याची सहजगत्या जाणीव करून देतात, पण अलिनसारखं एखादं उदाहरण जगासमोर नश्वरतेच्या पलीकडचा जगण्याचा अर्थ सांगून जातं. देहदान, करून अनेकांना जीवनसंजीवनी देणाऱ्या दात्यांना व त्यांच्या कुटुंबीयांना सलाम!

**–अश्विनी शिंदे – भोईर**

# नाट्य निरंतर राहो...



मराठी नाट्यसृष्टीत अनेक नाट्यकृती तर सादर होतातच; परंतु या क्षेत्राशी संबंधित अनेक उपक्रम त्या सोबतीने विविध पातळीवर सुरू असतात. असाच एक उपक्रम गेली १४ वर्षे नाट्यसृष्टीच्या सोबतीने चालत आला आहे. हा उपक्रम राबवला जातो, तो 'मराठी नाटक समूह' या ग्रूपच्या माध्यमातून...! या समूहात नाट्यसृष्टीशी संबंधित अनेक मंडळी आहेत आणि त्यांच्या सहकार्याने मराठी नाटक समूह गेली १४ वर्षे विविध गोष्टींच्या माध्यमातून महत्त्वाचे योगदान देत आला आहे. आता १४ वर्षे होत असताना मराठी नाटक समूहाने 'नाट्य निरंतर' असा आगळावेगळा उपक्रम हाती घेतला आहे. 'संकल्पना ते सादरीकरण : एक निरंतर प्रक्रिया' असे या नावीन्यपूर्ण उपक्रमाचे स्वरूप असून, 'मराठी नाटक समूह' आणि 'अभिषेक थिएटर्स' यांनी मिळून या उपक्रमाची पायाभरणी केली आहे. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद या उपक्रमाला सहकार्य करत आहे. २७ फेब्रुवारी रोजी मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून या उपक्रमाचा पडदा उघडत आहे. माहीम-माटुंगा येथील यशवंत नाट्यसंकुलात असलेल्या साळगांवकर प्रायोगिक रंगमंचावर या उपक्रमाचा शुभारंभ होत आहे.

एखादे नाटक म्हणजे संकल्पना ते सादरीकरण असा निरंतर प्रवास असतो. याच प्रवासाशी निगडित घटकांचा म्हणजे नव्या-जुन्या नाटकांची ओळख, स्वगते, कथा, कविता, नाट्य अभिवाचन, एकल प्रयोग, प्रहसन, गप्पा, चर्चा, मुलाखती, मार्गदर्शन अशा प्रकारच्या नाटकाशी व साहित्याशी संबंधित गोष्टींचा समावेश या 'नाट्य निरंतन'मध्ये करण्यात आला आहे. गेल्या १४ वर्षांच्या काळात मराठी नाटक समूहाने 'प्रायोगिक नाट्य महोत्सव', 'नाट्यलेखन स्पर्धा', 'पत्रलेखन स्पर्धा', 'विक्रमादित्य दामले', 'चंद्रकांत कुलकर्णी सादर करीत आहे'; असे विविध कार्यक्रम व उपक्रम यशस्वीपणे राबवले आहेत. इतकेच नव्हे; तर कोरोना प्रादुर्भावाच्या काळात मराठी नाटक समूहाने, पडद्यामागच्या कलाकारांना आर्थिक सहाय्य देण्यात मोठा पुढाकार घेतला होता. मागच्या वर्षी 'चंद्रकांत कुलकर्णी सादर करीत आहे' या कार्यक्रमानंतर मराठी नाटक समूहाचा कुठलाच कार्यक्रम सादर झाला नाही. मात्र आता 'नाट्य निरंतन'च्या माध्यमातून मराठी नाटक समूह नव्याने ठसा उमटवण्यासाठी सज्ज झाला आहे.

या एकूणच नावीन्यपूर्ण उपक्रमाच्या बाबतीत मराठी नाटक समूहातर्फे भूमिका मांडताना रंगकर्मी आशीर्वाद मराठे सांगतात, आमचा हा 'नाट्य निरंतर' उपक्रम 'मराठी नाटक समूह' व 'अभिषेक थिएटर्स' मिळून, अखिल भारतीय नाट्य परिषदेच्या सहकार्याने सुरू करत आहोत. नावीन्य हा या उपक्रमाचा महत्त्वाचा भाग असेल. इतर ठिकाणी आधीच सादर झालेल्या गोष्टी इथे कटाक्षाने टाळण्याचा प्रयत्न आम्ही करणार आहोत. या उपक्रमाच्या निमित्ताने अधिकाधिक नवीन प्रयोग केले जातील.

२७ फेब्रुवारी रोजी असलेल्या मराठी भाषा गौरव दिनाचा मुहूर्त साधत आम्ही हा उपक्रम सुरू करत आहोत. सध्या वर्षभर तरी दर महिन्याला हा उपक्रम करण्याचा आमचा मानस आहे. पहिल्या प्रयोगानंतर मिळणाऱ्या प्रतिसादावर पुढच्या योजना ठरवण्यात येतील. नाट्य आणि साहित्य यांचा संगम या निमित्ताने करण्यात येणार आहे. नवीन काही सादर करण्याच्या दृष्टीने यात चर्चाही होतील आणि नवीन संकल्पनांना या उपक्रमाच्या माध्यमातून उजाळा मिळेल, असा यामागचा आमचा उद्देश आहे.

**– राज चिंचणकर**

# मराठी भाषा टिकली पाहिजे

हरिश दुधाडेने मनोरंजनाच्या क्षेत्रात स्वतःची ओळख निर्माण केली आहे. 'क्रांती ज्योती विद्यालयं-मराठी माध्यम' या चित्रपटातील त्याची भूमिका प्रेक्षकांच्या लक्षात राहते. नुकतेच या चित्रपटाने थिएटरमध्ये रिलीज पन्नास दिवस साजरे केले आहेत.

हरिशचे शालेय शिक्षण अहमदनगरच्या श्री समर्थ विद्यामंदिर प्रशालामध्ये झाले. शाळेमध्ये श्लोक पठण केल्याने त्याची वाचा शुद्ध झाली. बोलण्यामध्ये स्पष्टपणा आला. चित्रकला, गाण्याच्या स्पर्धेत, नाटकामध्ये त्याने भाग घेतला होता. त्याच्या जडणघडण्यामध्ये शाळेचा सिंहाचा वाटा होता. त्यानंतर त्याने कॉलेजमध्ये एकांकिकेचे दिग्दर्शन केले. काही एकांकिकेमध्ये काम केले. कॉलेजमध्ये वर्गापेक्षा जास्त तो एकांकिकेच्या तालमीच्या ठिकाणी असायचा. त्यावेळी त्याला कॉलेजच्या शिक्षकांकडून भरपूर पाठिंबा मिळाला. त्यानंतर त्याने मुंबई गाठली.

एम. बी. ए. झाल्यावर मुंबईमध्ये दोन महिने त्याला काम मिळाले नाही. दोन महिन्यांनंतर त्याला एका मराठी चॅनेल वरील कन्यादान ही पहिली मालिका मिळाली. तिथून त्याचे या क्षेत्रात पदार्पण झाले. हा त्याच्या जीवनातील मोठा टर्निंग पॉइंट होता. 'तुमची मुलगी काय करते' या मालिकेत त्याने साकारलेला पोलीस अधिकारी प्रेक्षकांच्या चांगलाच लक्षात राहिलेला आहे. 'फत्तेशिकस्त' चित्रपटात त्याने बहिर्जी नाईकची भूमिका साकारली होती. आतापर्यंत साकारलेल्या भूमिकांपैकी बहिर्जी नाईकची भूमिका त्याची आवडती भूमिका होती. 'वीर मुरारबाजी' या आगामी चित्रपटात देखील त्याने बहिर्जी नाईकची भूमिका साकारली आहे.

हरिश दुधाडे व हेमंत ढोमे फार जुने मित्र आहेत. लेखक व दिग्दर्शक हेमंतला नेहमी कथेनुसार हरिशसोबत काम करण्याची इच्छा असते. 'फर्स्ट क्लास दाभाडे' या चित्रपटांमध्ये ते होते. आता 'क्रांतिज्योती विद्यालय-मराठी माध्यम' या चित्रपटात ते एकत्र आहेत. या चित्रपटामध्ये मराठी भाषेतील शाळेबद्दल भाष्य केले आहे. मराठी भाषेच्या शाळांची पटसंख्या कमी झाली, तर शाळा बंद होण्याचा मोठा धोका आहे, जो मराठी भाषेच्या अस्तित्वाला धोका आहे. मोठ्या संख्येने मुले इंग्रजी माध्यमाच्या शाळेत जात आहेत. त्यामुळे मराठी शाळेच्या अस्तित्वाला धोका निर्माण होत आहे; परंतु मराठी आपली मातृभाषा आहे. ती टिकवून ठेवणे खूप गरजेचे आहे. मातृभाषेतून शिक्षण घेतले तर तुम्ही इतर भाषा लवकर शिकू शकतात. मराठी भाषेला इतिहास आहे, आपली मराठी भाषा आपली आई आहे तिला वाचविणे आवश्यक आहे, या चित्रपटात तुझी कोणती भूमिका आहे असे विचारल्यावर तो म्हणाला की राकेश घरत नावाची व्यक्तिरेख मी साकारीत आहे. तो मराठी माणूस आहे, त्याचे शिक्षण मराठी माध्यमातून झालेले आहे. आंब्याचा व्यापारी आहे. त्याला दोन मुली आहेत, त्यांचे शिक्षण मराठी माध्यमातून झालेले असते; परंतु त्या शिवाय त्यांचे काही अडले नाही. इंग्रजी बोलता येणे ही एक कला आहे. लेखक व दिग्दर्शक हेमंत ढोमे सोबत व इतर कलावंतांसोबत काम करण्याचा अनुभव कसा होता असे विचारल्यावर तो म्हणाला की, हेमंत तर माझा मित्र आहे, त्याच्यासोबत व क्षितीसोबत माझे ट्युनिंग चांगले आहे. हेमंतच्या मनामध्ये काय चालले आहे हे मी ओळखतो व त्याला जे अपेक्षित आहे, ते करण्याचा प्रामाणिक प्रयत्न मी केला आहे. हेमंत एक गुणी लेखक व दिग्दर्शक आहे, प्रत्येक वेळी नवीन काही तरी आणण्याचा प्रयत्न तो करीत असतो, त्यामुळे त्याच्या सोबत काम करायला मिळणे ही पर्वणीच असते. सचिन खेडेकरांसोबत या अगोदर मी 'इन्स्पेक्टर झेंडे' या चित्रपटामध्ये काम केले होते. त्यांच्याकडून आजदेखील भरपूर गोष्टी आम्ही शिकत आहोत. ज्येष्ठ लेखक व कवी रत्नाकर मतकरी यांनी 'स्वर्गात आकाशगंगा' हे गाणे लिहिलेले आहे, जे खूप लोकप्रिय झालेले आहे. हेमंत ढोमेच्या कर्जतच्या अभिनव विद्यालयामध्ये या गाण्याचे लॉन्चिंग करण्यात आले. हा चित्रपट प्रेक्षकांना आवडतोय असे मत त्याने व्यक्त केले.

**- युवराज अवसरमल**

# महाज्योतीकडील स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण कार्यक्रम सुरूच विद्यार्थ्यांच्या मागणीमुळे ऑनलाईन प्रशिक्षणासही चालना

**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली –** महाज्योतीमार्फत ११ प्रकारचे स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत असून संघ लोकसेवा आयोग, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, राज्यसेवा व संयुक्त गट ब व क तसेच मिलीटरी भरती या परीक्षांचे प्रशिक्षण सध्या ऑफलाईन पद्धतीने सुरू आहे. या प्रशिक्षणाच्या स्वरूपात कोणताही बदल करण्यात आलेला नसून विद्यार्थ्यांना देण्यात येणारे विद्यावेतन व आकस्मिक निधी नियमितपणे चालू राहणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

संघ लोकसेवा आयोग (युपीएससी) प्रशिक्षणासाठी विद्यार्थ्यांना प्रतिमाह १३ हजार रुपये विद्यावेतन तसेच एकवेळ १८ हजार रुपये आकस्मिक निधी दिला जातो. तर एमपीएससी राज्यसेवा, गट ब व क आणि मिलीटरी भरती प्रशिक्षणासाठी प्रतिमाह १० हजार रुपये विद्यावेतन व एकवेळ १२ हजार रुपये आकस्मिक निधी प्रदान करण्यात येतो.

सन २०२५/२०२६ या आर्थिक वर्षात विविध प्रशिक्षणांद्वारे मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांना लाभ देण्यात आला आहे. त्यामध्ये महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा प्रशिक्षणातून २९८, कर्मचारी निवड आयोग प्रशिक्षणात ४९९, मिलीटरी भरती प्रशिक्षणात१५००, एमबीए (सीएटी/सीएमएटी-सीईटी) प्रशिक्षणात १५००, युजीसी न ेट / सीएसआयआर/एमएच-सेट मध्ये१२००, युपीएससी मध्ये४००, एमपीएससी गट ब व क मध्ये ४००, एमपीएससी राज्यसेवा प्रशिक्षणात ३०० तसेच जेइइ/ नीट/एमएचटी-सीईटी प्रशिक्षणात ३५०० विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

दरम्यान, आयबीपीएस-पीओ, बँकिंग, रेल्वे, कर्मचारी निवड आयोग व रेल्वे भरती या परीक्षांचे स्वरूप ऑनलाईन असल्याने सन २०२६/२०२७पासून संबंधित प्रशिक्षण कार्यक्रम ऑनलाईन पद्धतीने राबविण्याचा प्रस्ताव आहे. या अंतर्गत विद्यार्थ्यांना निवास-भोजनाऐवजी टॅबलेट व डेटा सिम देण्यात येणार असून घरबसल्या प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध होणार आहे.

ऑनलाईन प्रशिक्षणाबाबत विद्यार्थ्यांकडून मोठ्या प्रमाणात मागणी प्राप्त झाली आहे. महाज्योतीकडे एकूण ४४९०३ अर्ज प्राप्त झाले असून त्यामध्ये एमपीएससी अभियांत्रिकीसाठी ४हजार ८३९, एसएससी साठी १४ हजार ४४७, बँकिंग/रेल्वे/ एलआयसीसाठी १८ हजार २६५ व आरआरबी साठी ७ हजार ३५२ अर्जांचा समावेश आहे. तसेच जेइइ/नीट/ एमएचटी-सीईटी प्रशिक्षणासाठी ४१ हजार ८०३ विद्यार्थ्यांनी अर्ज केले होते.



विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या टॅबलेटचा बॅटरी बॅकअप सुमारे १२ तासांचा असल्याने वीज खंडित झाल्यासही शिक्षणात अडथळा येणार नाही. तसेच विद्यार्थ्यांना त्यांच्या परिसरात उपलब्ध असलेल्या कोणत्याही नेटवर्क कंपनीचे सिम निवडण्याची मुभा देण्यात आली आहे.

ऑनलाईन प्रशिक्षणामध्ये लाईव्ह मार्गदर्शन, शंका निरसन, साप्ताहिक परीक्षा तसेच आवश्यक नोट्स व पुस्तके पीडीएफ स्वरूपात उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. आर्थिक अडचणींमुळे किंवा कौटुंबिक कारणांमुळे बाहेरगावी जाऊ न शकणाऱ्या विद्यार्थ्यांनाही या सुविधेचा लाभ मिळणार आहे.।

वरील सर्व बाबींचा विचार करता, कोणताही प्रशिक्षण कार्यक्रम बंद नसून चालू आर्थिक वर्षातील सर्व प्रशिक्षण पूर्ण झालेले आहेत. विद्यार्थ्यांच्या वाढत्या मागणीचा विचार करूनच ऑनलाईन प्रशिक्षणाचा निर्णय घेण्यात आल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

## हिंगोली येथे मराठी भाषा गौरव दिनानिमित्त परिसंवाद व कवी संमेलनाचे आयोजन २७ फेब्रुवारी ला

**आत्ताच एक्सप्रेस**




**हिंगोली-** मराठी भाषा गौरव दिनानिमित्त मराठवाडा साहित्य परिषद हिंगोली व थवा प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने हिंगोली येथे २७ फेब्रुवारी रोजी दुपारी चार वाजता बियाणी नगर येथील तुळसाबाई सोमाणी ट्रस्ट येथे परिसंवाद व चर्चासत्र यासह कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे.

मराठवाडा साहित्य परिषदेच्या हिंगोली शाखा व थवा प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमात परिसंवाद व चर्चासत्र करिता अध्यक्ष म्हणून जेष्ठ कादंबरीकार तथा मराठवाडा साहित्य परिषदेच्या हिंगोली शाखेचे अध्यक्ष अशोक अर्धापुरकर यांच्यासह प्राचार्य नामदेवराव वाबळे, डॉक्टर संजय नाकाडे, परिषदेचे कार्यवाह दिलीप धामणे यांची उपस्थिती राहणार आहे.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉक्टर गायत्री दरगू तर आभार प्रदर्शन पारिजात देशमुख हे करणार आहेत. यानंतर कवी संमेलन पार पडणार असून यावेळी संमेलनाचे अध्यक्ष म्हणून जेष्ठ कवी रतन आडे यांच्यासह राजाराम बनसकर, जेष्ठ कवयित्री सुमनताई दुबे उर्फ स्वामिनी तर निमंत्रित कवींमध्ये गोडाती काळे, गणेश येवले, शिवाजी कराळे, महारुद्र घेणेकर, रघुनाथ घुगे, प्रद्युम्न गिरीकर, विजय गुंडेकर, राजकुमार मोरगे, रघुवीर पतंगे, चंद्रकांत नागरे, सविता देशमुख, सविता जाधव, ज्ञानदा चौधरी, वंदना काबरा, दर्शना भुरे, मयुरी जांबुतकर, गौरी गुंडेवार, विजयाताई पतंगे, रसिका विडोळकर, समाधान लोणकर यांची उपस्थिती राहणार आहे. या संमेलनाचे सूत्रसंचालन डॉक्टर राधिका देशमुख तर आभार प्रदर्शन अश्विनी देशमुख मानणार आहेत. या साहित्याच्या मेजवानीला रसिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन मराठवाडा साहित्य परिषदेच्या हिंगोली शाखेच्या वतीने करण्यात आले आहे.

## महाराष्ट्र विद्यालय माळहिवरा येथे विद्यार्थ्यांची सिकलसेल आरोग्य तपासणी

**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली–** हिंगोली तालुक्यातील माळहिवरा येथे दिनांक २५ फेब्रुवारी रोजी सिकलसेल आरोग्य सेवा अंतर्गत महाराष्ट्र विद्यालयातील विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

दिनांक २५/०२/२०२५ रोजी मौजे माळहिवरा येथील महाराष्ट्र विद्यालय शाळेतील विद्यार्थ्यांची तालुका आरोग्य अधिकारी डॉ. गणेश जोगदंड, वैद्यकीय अधिकारी डॉ दिपाली पतंगे, श्रीमती डॉ. गुठ्ठे,इंगोले यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांची सिकलसेल ॅनिमिया सोलयुबिटी टेस्ट तपासणी करण्यात आली.यावेळी उपस्थित आरोग्य कर्मचारी एमपीडब्ल्यु माधव भोयर, मुख्याध्यापक जी.एस.टाले यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व सिकलसेल आजाराबद्दल माहिती दिली.

सिकलसेल आजारात लाल रक्तपेशी ह्या विळयाच्या आकाराच्या होऊन रक्तात अडथळा निर्माण करतात ह्यामुळे अशक्त पणा चक्कर येणे रक्तातील हिमोग्लोबिनचे कमी होऊन ॲनिमिक आजार होऊ शकतो. आरोग्य शिक्षण देण्यात आले यावेळी डी.एच.वानखेडे, एम.ए.पठाण, लिपिक जी.टी. सरनायक, आशावर्कर प्रयाग कदम (लोंढे) यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

# बारावी जीवशास्त्रची परीक्षा जिल्ह्यातील १०९ परीक्षा केंद्रावर सुरळीत-जिल्हाधिकारी राहूल कर्डिले

### कंधार तालुक्यात पानभोसी केंद्रावर पेपर संपेपर्यंत जिल्हाधिकाऱ्यांची उपस्थिती

**आत्ताच एक्सप्रेस**

**नांदेड –** जिल्ह्यात इयत्ता बारावीच्या जीवशास्त्र विषयाची परीक्षा जिल्ह्यातील १०९ केंद्रांवर आज सुरळीतपणे पार पडली. एकूण २१ हजार ९३७ परीक्षार्थ्यांपैकी २१ हजार ५५० विद्यार्थी उपस्थित राहिले असून उपस्थितीचे प्रमाण ९८.२४ टक्के नोंदविण्यात आले. प्रत्येक परीक्षा केंद्रावर बैठे पथकांमार्फत झूम वेबकास्टद्वारे तसेच ड्रोन आणि व्हिडिओ कॅमेराच्या सहाय्याने संपूर्ण वेळ परीक्षेवर नियंत्रण ठेवण्यात आले. त्यामुळे सर्व १०९ केंद्रांवर परीक्षा शांततापूर्ण व कॉपीमुक्त वातावरणात पार पडल्याची माहिती जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिली.




कंधार तालुक्यात पानभोसी येथील नेताजी सुभाषचंद्र बोस उच्च माध्यमिक विद्यालय या केंद्रास भेट देऊन परीक्षा व्यवस्थेची पाहणी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केली. ते या केंद्रावर पेपर संपेपर्यंत उपस्थित होते. त्यांच्यासमवेत उपमुख्य कार्यकारी अधिकारी दत्तात्रय गिरी हे देखील उपस्थित होते.

नायगाव तालुक्यात नरसी येथील राणी लक्ष्मीबाई कमवि येथे उपमुख्य कार्यकारी अधिकारी अमित राठोड यांनी भेट दिली असता एक परीक्षार्थी गैरप्रकार करताना आढळून आला. संबंधित विद्यार्थ्यावर मंडळाच्या नियमानुसार कारवाई करण्यात आली. नायब तहसीलदार श्रीमती अरुणा सूर्यवंशी यांनी माहूर येथील जगदंबा उच्च माध्यमिक विद्यालय येथे भेट दिली असता एका विद्यार्थ्यावर गैरप्रकार प्रकरणी कारवाई करण्यात आली.

तसेच किनवट येथील दहेलीतांडा या परीक्षा केंद्राच्या बाहेर काही अज्ञात व्यक्ती आढळून आल्याने त्या ठिकाणी संबंधित व्यक्तींविरोधात सिंदखेड पोलीस स्टेशन येथे गुन्ह्याची नोंद करण्याची कार्यवाही सुरु आहे, अशी माहिती दहेलीतांडा परीक्षा केंद्राचे संचालक यांनी दिली.

आज २५ फेब्रुवारी रोजी जीवशास्त्राच्या पेपरसाठी जिल्हास्तरावरील सुमारे ६२ अधिकारी हे ६२ केंद्रांवर पूर्णवेळ उपस्थित होते. शिक्षण विभागाचे ७ अधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार व गटविकास अधिकारी अशा एकूण ४० व इतर अधिकाऱ्यांनी भरारी पथकांमार्फत १०९ केंद्रांवर देखरेख ठेवली.

दहावी-बारावीच्या सर्व परीक्षा कॉपीमुक्त वातावरणात होत असून विद्यार्थी व पालकांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. उर्वरित परीक्षा देखील अशाच पारदर्शक, शिस्तबद्ध वातावरणात पार पाडण्यासाठी प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

# दहेली (ता. किनवट) येथे अवकाळी पाऊस व गारपिटीचा तडाखा

### रब्बी पिकांचे शंभर टक्के नुकसान; शेतकरी आर्थिक संकटात


*** आत्ताच एक्सप्रेस**

**लक्ष्मीकांत मुंडे**

**किनवट –** तालुक्यातील दहेली येथे काल अचानक झालेल्या अवकाळी पाऊस, गारपीट आणि जोरदार वाऱ्यामुळे रब्बी हंगामातील पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. हातातोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून घेतल्याने शेतकरी हतबल झाले असून मका, ज्वारी, हरभरा व गहू ही पिके मोठ्या प्रमाणात जमिनीवर आडवी पडली आहेत. प्राथमिक अंदाजानुसार अनेक शेतांमध्ये शंभर टक्के नुकसान झाले आहे.

घटनेनंतर संतप्त शेतकऱ्यांनी तात्काळ पंचनामा करून नुकसानभरपाई जाहीर करण्याची मागणी केली आहे. कृषी सहाय्यक सेवाळे व तलाठी लहानकर यांनी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या बांधावर भेट देऊन प्राथमिक पाहणी केली असून परिस्थिती अत्यंत गंभीर असल्याचे स्पष्ट झाले आहे.

नुकसानग्रस्त शेतकऱ्यांमध्ये प्रफुल परमेश्वरराव काळे, सुरेश विठ्ठलराव भोसले, धीरज मुळे, कमलाबाई दत्तात्रय गाढवे, विनोद तोटावार, अजय श्रीनिवास जाधव, विशाल परमेश्वर चव्हाण, किरण जाधव, दिलीपराव भोसले, राहुल जाधव व प्रणित कचकलवार यांचा समावेश असून संबंधित शेतांची पाहणी



करण्यात आली असता पिकांचे पूर्ण नुकसान झाल्याचे समोर आले आहे. या अचानक आलेल्या नैसर्गिक संकटामुळे शेतकरी पुन्हा आर्थिक संकटात सापडले असून शासनाने तात्काळ पंचनामा पूर्ण करून आर्थिक मदत जाहीर करावी, तसेच आमदार व खासदारांनी अधिवेशनात हा प्रश्न उपस्थित करून शेतकऱ्यांना न्याय मिळवून द्यावा, अशी एकमुखी मागणी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे.

## महाराष्ट्र शासनचा महागाई भत्ता 3% ने वाढ,५५ वरुन ५८% करण्याचा निर्णय राज्य कर्मचाऱ्यांसाठी खुशखबर

**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली–** राज्य शासकीय कर्मचारी व इतर पात्र कर्मचाऱ्यांसाठी महत्त्वाचा दिलासादायक निर्णय घेत महाराष्ट्र शासनने महागाई भत्ता ५५ टक्क्यांवरुन ५८ टक्के करण्यास मंजुरी दिली आहे. हा निर्णय दि. १जुलै २०२५ पासून लागू राहणार असून, प्रत्यक्ष वाढीव रक्कम फेब्रुवारी २०२६ पासून रोखीने देण्यात येणार आहे.

दि. २५ फेब्रुवारी २०२६ रोजी वित्त विभागाने शासन निर्णय (क्र. मभवा-१३२५/प्र.क्र.१९/ सेवा-९) जारी केला. हा निर्णय केंद्र सरकारच्या दि. ६ ऑक्टोबर विभागाने शासन सेवा-८२ २०२५ च्या कार्यालयीन ज्ञापनाच्या अनुषंगाने घेण्यात आला आहे.

**थकबाकी मार्चमध्ये**

जुलै २०२५ ते ऑक्टोबर २०२५ या कालावधीतील थकबाकी मार्च २०२६ मध्ये रोखीने अदा करण्यात येणार आहे. उर्वरित कालावधीतील थकबाकीबाबत स्वतंत्र आदेश काढण्यात येतील, असे शासनाने जाहीर केलेले आहे.

**७ व्या वेतन आयोगानुसार लाभ**

हा वाढीव महागाई भत्ता ७ व्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतन संरचनेतील मूलभूत वेतनावर लागू राहील. महागाई भत्त्याच्या देयकासंदर्भातील विद्यमान तरतुदी आणि कार्यपद्धती यापुढेही कायम राहणार आहेत.

**खर्चाची तरतूद**

महागाई भत्त्यावरील अतिरिक्त खर्च संबंधित लेखाशीर्षाखाली मंजूर अनुदानातून भागविण्यात येणार आहे.

अनुदानप्राप्त संस्था व जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या बाबतीतही हीच कार्यपद्धती लागू राहील.राज्य शासनाच्या या निर्णयामुळे लाखो कर्मचाऱ्यांना वाढत्या महागाईच्या पार्श्वभूमीवर आर्थिक दिलासा मिळणार आहे.

## १ मार्च रोजी हिंगोली येथे एक भव्य हिंदू अधिवेशन होणार

### हिंदू धर्मातील सर्व समुदायांना एकत्र आणणे हे ध्येय

**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली–** संघटित हिंदू धर्म, शक्तिशाली भारत या संकल्पनेसह, देशातून जातीवादाला निरोप देत, आपण सर्व हिंदू भाऊ आहोत अशी घोषणा देत, १ मार्च रोजी हिंगोली शहरात एक विशाल हिंदू अधिवेशन आयोजित करण्यात आले आहे. हिंदू धर्मातील सर्व समुदायांना एकत्र आणण्याच्या उद्देशाने, हे भव्य हिंदू अधिवेशन रविवारी दुपारी ४.३० ते ७.३० या वेळेत शहरातील रामलीला मैदानावर होणार आहे. या कार्यक्रमात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय कार्यकारिणी सदस्य इंद्रेशकुमारजी प्रमुख वक्ते आणि



मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार आहेत. या भव्य हिंदू परिषदेचे आयोजन हिंदू परिषदेच्या समिती, हिंगोली शहरातर्फे केले जात आहे. या कार्यक्रमाला सर्व हिंदूंनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीकडून नाशिकला प्रादेशिक नाविन्यता केंद्राचा प्रस्ताव, गोदावरी इन्व्हेस्टमेंट अँड इम्पॅक्ट कॉन्क्लेव्हचे उद्‌घाटन

**आत्ताच एक्सप्रेस**

**नाशिक –** महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. श्रीकांत पाटील यांनी नाशिक येथील ताज गेटवे आयोजित गोदावरी इन्व्हेस्टमेंट अँड इम्पॅक्ट कॉन्क्लेव्हचे उद्घाटन केले. या परिषदेत वरिष्ठ शासकीय अधिकारी, उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधी, गुंतवणूकदार, स्टार्टअप्स आणि परिसंस्था उभारणी करणाऱ्या संस्थांचा सहभाग होता. शाश्वत प्रादेशिक विकासासाठी कल्पना, भागीदारी आणि गुंतवणूक एकत्र आणण्यावर परिषदेत भर देण्यात आला.

उद्घाटन सत्राला नाशिकचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी आयुष प्रसाद, चे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी भोमिक शाह आणि चे ग्लोबल डायरेक्टर जेम्स ॲशल उपस्थित होते. विविध क्षेत्रांतील समन्वयातून तुकड्या-तुकड्यांच्या उपक्रमांऐवजी प्रणालीगत व नाविन्यता-आधारित परिणाम साध्य करण्याची गरज यावेळी अधोरेखित करण्यात आली.

यावेळी डॉ. श्रीकांत पाटील म्हणाले की, महाराष्ट्रातील जिल्हास्तरावर नाविन्यता परिसंस्था मजबूत करण्याचा राज्याचा रोडमॅप मांडला आणि नाशिकला स्वतंत्र प्रादेशिक नाविन्यता केंद्र म्हणून विकसित करण्याचा प्रस्ताव मांडला. महाराष्ट्र स्टार्टअप धोरणांतर्गत नाविन्यात सोसायटी कल्पनेपासून विस्तारापर्यंत स्टार्टअप्सना मार्गदर्शन, संस्थात्मक भागीदारी, भांडवल उपलब्धता आणि शासकीय समन्वय यांद्वारे एकात्मिक सहाय्य प्रणाली उभारत असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

तसेच त्यांनी रेअर अर्थ मेटल्स आणि महत्त्वपूर्ण खनिज मूल्यसाखळी यांसारख्या उदयोन्मुख क्षेत्रांमध्ये स्टार्टअप्सनी संशोधन व नाविन्यता-आधारित उपाय विकसित करण्याचे आवाहन केले.

डॉ. पाटील यांनी पुढे सांगितले की, ग्रामीण भागातील विद्यार्थी, नवउद्योजक आणि प्रारंभीच्या टप्प्यातील स्टार्टअप्सना सक्षम करण्यासाठी तळागाळात मायक्रो-इन्क्युबेटर्स स्थापन करण्याचा मानस आहे. या विकेंद्रित दृष्टिकोनातून महानगरांबाहेरील स्थानिक प्रतिभेला चालना मिळेल आणि प्रादेशिक समस्यांवर स्थानिक उपाय निर्माण होतील.

नाशिकमधील ३० हून अधिक उद्योग प्रतिनिधींशी झालेल्या गोलमेज परिषदेत आगामी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर शाश्वत पायाभूत सुविधा, हवामान बदल अनुकूलन, पाणी व कचरा व्यवस्थापन तसेच तंत्रज्ञानाधारित सार्वजनिक प्रणाली यावर चर्चा झाली. आणि नाविन्यता-आधारित हस्तक्षेपांच्या माध्यमातून कुंभला जागतिक स्तरावरील ''लिव्हिंग लॅब'' म्हणून विकसित करण्याची संकल्पना मांडण्यात आली.

डॉ. पाटील यांच्या हस्ते सस्टेनेबिलिटी इनोव्हेशन लॅब अंतर्गत निवडलेल्या स्टार्टअप्सना पारितोषिक वितरण करण्यात आले. नाविन्यता-आधारित आणि प्रभावाभिमुख उद्योजकतेला चालना देण्याची नाविन्यता सोसायटी बांधिलकी त्यांनी पुनः अधोरेखित केली.

यावेळी आयोजित प्रादेशिक स्टार्टअप व नाविन्यता संवाद कार्यक्रमाच्या निमित्ताने डॉ. श्रीकांत पाटील यांनी स्टार्टअप्स, इन्क्युबेटर्स, गुंतवणूकदार आणि परिसंस्था सक्षमीकरण करणाऱ्या संस्थांशी थेट संवाद साधला. यावेळी त्यांनी राज्यातील प्रादेशिक स्टार्टअप परिसंस्था बळकट करण्याची दृष्टी मांडली. ग्रामीण भागातील नाविन्यता, इन्क्युबेशन नेटवर्क आणि परिणामाभिमुख उपक्रमांच्या माध्यमातून तळागाळात प्रभाव निर्माण करण्यासाठी महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी राबवत असलेल्या धोरणात्मक उपक्रमांची माहिती त्यांनी दिली.

गोदावरी इन्व्हेस्टमेंट अँड इम्पॅक्ट कॉन्क्लेव्ह तसेच प्रादेशिक स्टार्टअप संवादाच्या माध्यमातून नाशिकला नाविन्यता-आधारित शाश्वत विकासाचे प्रादेशिक केंद्र म्हणून विकसित करण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल टाकण्यात आले आहे.

# आता कर्जमाफीच अंतिम दिलासा; निर्णय झाला नाही तर ग्रामीण भागात संताप उसळणार!

* आत्ताच एक्सप्रेस
**लक्ष्मीकांत मुंडे**


**किनवट –** किनवट तालुक्यासह जिल्ह्यात वाढत्या कर्जबाजारीपणामुळे शेतकरी आर्थिक कोंडीत सापडले असून शेती करणे दिवसेंदिवस तोट्याचे ठरत आहे. उत्पादन खर्चात झालेली मोठी वाढ, बाजारात मिळणारे अपुरे दर, नैसर्गिक आपत्तींचा वाढता फटका आणि कर्जाचा बोजा यामुळे शेतकरी वर्ग हतबल झाला आहे. परिस्थिती इतकी गंभीर झाली आहे की अनेक शेतकऱ्यांनी पीककर्जाची परतफेड थांबवली असून काही ठिकाणी नव्याने कर्ज मिळणेही बंद झाले आहे.

खत, बियाणे, कीटकनाशके, मजुरी, इंधन व सिंचन खर्चात झालेल्या वाढीमुळे शेतीचा खर्च प्रचंड वाढला आहे. त्यातच हमीभाव न मिळाल्याने शेतमाल विक्रीतून उत्पादन खर्चही निघत नसल्याने शेतकरी कर्जाच्या दलदलीत अधिक खोलवर अडकत आहेत. अनेक शेतकरी बँका व पतसंस्थांच्या कर्जाखाली दबले असून थकीत कर्जामुळे त्यांना नोटिसा दिल्या जात आहेत. काही ठिकाणी थकीत कर्जामुळे नवीन कर्जपुरवठा थांबविण्यात आल्याने आगामी हंगामाचे नियोजन धोक्यात आले आहे.

सध्या सुरू असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात सरकारकडून कर्जमाफीची घोषणा होण्याची शक्यता राजकीय वर्तुळात व्यक्त होत असून निवडणुकांदरम्यान दिलेल्या आश्वासनांची आठवण करून देत शेतकरी ठोस निर्णयाची वाट पाहत आहेत. संपूर्ण कर्जमाफी, थकीत कर्जावरील व्याजमाफी, कर्ज पुनर्गठन योजना, नवीन कर्जासाठी सुलभ प्रक्रिया आणि शेतीमालाला हमीभाव देण्याच्या प्रमुख मागण्या शेतकरी संघटनांकडून पुढे येत आहेत.

मागील योजनांच्या अंमलबजावणीत आलेल्या अडचणी पाहता यावेळी स्पष्ट निकष, पारदर्शक प्रक्रिया आणि सर्वसमावेशक लाभ देण्याची गरज व्यक्त केली जात आहे. अन्यथा घोषणा आणि प्रत्यक्ष लाभ यामध्ये तफावत राहील, अशी भीती व्यक्त होत आहे. तज्ज्ञांच्या मते, कर्जमाफीचा दिलासा मिळाल्यास ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळू शकते; परंतु सरकारने निर्णय लांबविल्यास असंतोष वाढून सामाजिक व आर्थिक तणाव निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

शेतकऱ्यांचा संयम संपत चालला असून आता घोषणांपेक्षा ठोस निर्णयाची अपेक्षा आहे. सरकारने तातडीने सकारात्मक निर्णय घेतला नाही तर ग्रामीण भागात संतापाची लाट




उसळण्याची चिन्हे स्पष्ट दिसत असून सर्वांचे लक्ष आता सरकारच्या निर्णयाकडे लागले आहे.

# डोंगरगाव प्रकल्पातून तात्काळ पाणी सोडा; अन्यथा शेती, पशुधन आणि वन्यजीव धोक्यात बोधडी-पार्डी परिसरातील शेतकऱ्यांचा इशारा

* आत्ताच एक्सप्रेस
**लक्ष्मीकांत मुंडे**

**किनवट –** डोंगरगाव मध्यम प्रकल्पाखालील क्षेत्रातील बोधडी बु., बोधडी खुर्द आणि पार्डी खुर्द परिसरातून वाहणारा मुख्य नाला गेल्या दोन महिन्यांपासून पूर्णतः कोरडा पडल्याने या भागातील शेती, पशुधन आणि वन्य प्राण्यांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न अत्यंत गंभीर बनला आहे. परिस्थिती बिकट होत चालल्याने प्रशासनाने विशेष बाब म्हणून तातडीने प्रकल्पातून नाल्यात पाणी सोडावे, अशी जोरदार मागणी शेतकऱ्यांनी केली असून यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन पाठविण्यात आल्याची माहिती बोधडी खुर्द येथील शेतकऱ्यांनी दिली.

उन्हाळ्याची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असून उन्हाळी हंगामातील पिके वाचविणे, तसेच पाळीव पशुधन व वन्य प्राण्यांच्या पिण्याच्या पाण्याची सोय करणे अत्यावश्यक झाले आहे. किनवट येथील लघू पाटबंधारे उपविभागाच्या कार्यक्षेत्रातील डोंगरगाव मध्यम प्रकल्पातून तातडीने पाणी सोडण्यात यावे, अन्यथा उन्हाळी पिके पाण्याअभावी वाया जाण्याची भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

यंदाचा खरीप हंगाम अतिवृष्टीने हिरावून घेतला असून आता उन्हाळी हंगाम तरी शेतकऱ्यांच्या पदरात पडावा, यासाठी प्रशासनाने ठोस निर्णय घ्यावा, अशी मागणी पुढे येत आहे. नांदेड जिल्हाधिकाऱ्यांनी डोंगरगाव मध्यम प्रकल्पातून बोधडी खुर्द व पार्डी खुर्द परिसरातील नाल्यात वेळेत पाणी सोडून पाणीटंचाईचा प्रश्न मार्गी लावावा, असा शेतकऱ्यांचा आग्रह आहे.

नाला कोरडा पडल्याने शेतीबरोबरच पाळीव जनावरांचे व वन्य प्राण्यांचे जीवन धोक्यात आले आहे. वनविभागाने वनतळ्यांच्या माध्यमातून वन्य प्राण्यांसाठी पाण्याची व्यवस्था करणे अपेक्षित होते; मात्र ती न झाल्याने वन्य प्राणी पाण्यासाठी वणवण भटकताना दिसत आहेत. त्यामुळे बोधडी नाल्यात डोंगरगाव प्रकल्पातून पाणी सोडणे अत्यावश्यक असल्याचे स्थानिकांनी सांगितले.

शेती, पशुधन आणि वन्यजीव या तिन्ही घटकांच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाल्याने प्रशासनाने मानवी आणि पशू संवेदनांचा विचार करून तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे. जिल्हाधिकाऱ्यांसह किनवटचे सहाय्यक जिल्हाधिकारी, तहसीलदार, तसेच लघू पाटबंधारे विभागाच्या उपअभियंत्याकडे शेतकऱ्यांनी तातडीची कारवाई करण्याची मागणी केली आहे.

# येहळेगाव सोळंके बिट परिसरात अवैध रेती वाहतूक उघड; टिप्पर चालकासह वाहन जप्त

आत्ताच एक्सप्रेस

**औंढा नागनाथ –** पोलीस स्टेशन औंढा हद्दीतील येहळेगाव सोळंके बिट परिसरात सुरू असलेल्या अवैध धंद्यांविरोधात कारवाई करताना पोलिसांनी अवैध रेती वाहतूक करणारा टिप्पर पकडला. आज पोलीस स्टेशन औंढाचे पथक पोह १२८ रविकांत सोपानराव हरकाळ यांच्या नेतृत्वाखाली पोअ/९४७ किशोर काशीबा परिसकर तसेच होमगार्ड क्रमांक १३०५ काळे व २६९७ लांडे हे पेट्रोलिंग करत असताना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे सिद्देश्वर ते नंदगाव मार्गावरील चढावर संशयित टिप्पर अडविण्यात आला.




तपासणीदरम्यान एमएच ३८ सी ३६६३ क्रमांकाचा टिप्पर अवैधरित्या रेती वाहतूक करत असल्याचे आढळून आले. चालक बालू उर्फ गंगाधर माधवराव लडके (वय २९, रा. जिरेगल्ली, ता. औंढा नागनाथ) यास वाहनासह ताब्यात घेण्यात आले आहे.

सदर वाहन जप्त करण्यात आले असून आरोपीविरुद्ध पोलीस स्टेशन औंढा नागनाथ येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन, अपर पोलीस अधीक्षक कमलेश मीना व पोलीस निरीक्षक गणेश राहिरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

अवैध रेती वाहतूक व गौण खनिज उत्खननाविरोधातील ही कारवाई पुढील काळातही सुरू राहणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

# मध्यप्रदेश मुख्यमंत्र्यांच्या सौभाग्यवतींनी घेतले श्री रेणुका मातेचे दर्शन

## मध्यप्रदेश मुख्यमंत्र्यांच्या सौभाग्यवती सीमाताई यादव यांनी घेतले श्री रेणुका मातेचे दर्शन, पवार कुटुंबीयांच्या लग्न समारंभास उपस्थिती

* आत्ताच एक्सप्रेस
**लक्ष्मीकांत मुंडे**

**श्रीक्षेत्र माहूर –** मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव यांच्या सुविद्य पत्नी सौ सीमाताई यादव यांनी माहूर गडावर येऊन श्री रेणुका मातेचे दर्शन घेत निसर्ग संपदेचे अवलोकन करत प्रतिष्ठित बाबाराव पवार कुटुंबीयांच्या लग्नसमारंभास उपस्थिती लावली यावेळी श्री रेणुका माता मंदिरात विश्वस्त चंद्रकांत भोपी संजय कान्नव यांचे सह मान्यवरांनी त्यांचा सत्कार केला

मध्यप्रदेशचे लोकप्रिय मुख्यमंत्री मोहन यादव यांच्या सुविद्य पत्नी सौ सीमाताई यादव यांना राज्य शासनाने राज्य अतिथी दर्जा दिल्याने कडे कोट बंदोबस्तात त्यांचे माहूरला आगमन झाल्यानंतर त्यांनी प्रथम श्री रेणुका मातेचे दर्शन घेत आरती केली



यानंतर श्री दत्त शिखर मंदिरात जाऊन त्यांनी दर्शन घेत संत श्री वासुदेव भारती महाराज यांचेही आशीर्वाद घेतले त्यानंतर जंगल मार्गाने गडावर असलेल्या निसर्ग संपदेची पाहणी करून प्रशंसा केली त्यानंतर त्यांनी रात्री माहूर शहराचे रहिवासी असलेले एसबीआय बँकेचे निवृत्त मुख्य व्यवस्थापक बाबाराव पवार यांचा मुलगा डॉ सुशांत सौ शीला बाबाराव पवार आणि सौ संध्या रवी सोलंकी मध्य प्रदेश भाजपा चे ज्येष्ठ नेते डॉ रवी कैलासचंद्र सोलंकी रा उज्जैन म प्र यांची मुलगी डॉ सौ रैनी यांच्या लग्नाच्या रिसेप्शनला भेट देऊन त्यांच्या आनंदात त्या सामील होत लग्न झालेले डॉ सुशांत व डॉ रैनी यांना त्यांनी शुभाशीर्वाद दिले

यावेळी बाबाराव पवार सौ शीला बाबाराव पवार यांचे सह नगराध्यक्ष फिरोज दोसानी आणि लोकनेते तथा शिवसेनेचे जिल्हा अध्यक्ष ज्योतिबा दादा खराटे यांचे सह साहिल बाबाराव पवार सौ दिशा साहिल पवार यांनी आलेल्या सर्व मान्यवरांचे स्वागत सत्कार केले.

# जिल्ह्यात जमावबंदी, शस्त्रबंदी आदेश लागू

आत्ताच एक्सप्रेस

**नांदेड –** नांदेड जिल्ह्यात २६ फेब्रुवारीचे सकाळी ६ वाजेपासून ते १२ मार्च २०२६ रोजीच्या मध्यरात्री पर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहणार आहे, अशी माहिती अपर जिल्हादंडाधिकारी कार्यालयाकडून देण्यात आली आहे.

जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून अपर जिल्हादंडाधिकारी यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) व (३) अन्वये जिल्ह्यात २६ फेब्रुवारीचे सकाळी ६ वाजेपासून ते १२ मार्च २०२६ रोजीच्या मध्यरात्रीपर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहिल. त्यानुसार पाच किंवा पाचपेक्षा अधिक व्यक्तींनी या आदेशात नमुद असलेली कृत्ये सार्वजनिक परिसर किंवा त्याच्या जवळपास करण्यास बंदी घालण्यात आली आहे. हा आदेश कामावरील पोलीस अधिकारी, शासकीय कर्मचारी, विवाह, अंत्ययात्रा, धार्मिक कार्यक्रम, यात्रा व इतर सक्षम अधिकारी यांनी विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणुकांना लागू होणार नाही.

अशा मिरवणुकांना परवानगी देण्याचे अधिकार तसेच पाच व पाचपेक्षा जास्त इसम जमण्यासाठी, सभा, मिरवणुका, मोर्चा काढणे, ध्वनीक्षेपक वाजविण्यास परवानगी देण्याचे अधिकार जिल्ह्यातील पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना तसेच पोलीस अधीक्षक नांदेड यांनी प्राधिकृत केलेल्या इतर पोलीस अधिकारी यांना राहतील.

# जि.प. केंद्रीय प्राथमिक शाळा माहूरच्या मुख्याध्यापकांचा मनमानी कारभार

## मनविसे आक्रमक, तत्काळ बदलीची मागणी अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा

* आत्ताच एक्सप्रेस
**लक्ष्मीकांत मुंडे**

**श्रीक्षेत्र माहूर –** येथील जिल्हा परिषद केंद्रीय उच्च प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापकांच्या बेजबाबदार आणि आडमुठ्या कारभारामुळे शालेय व्यवस्थेचा पूर्णपणे बोजवारा उडाला असून, पालकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. या गंभीर प्रकरणाची दखल घेत महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेच्या वतीने गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती माहूर यांना निवेदन देऊन संबंधित मुख्याध्यापकाची तत्काळ बदली करण्याची आक्रमक मागणी करण्यात आली आहे.

या निवेदनाच्या प्रति जिल्हा शिक्षणाधिकारी प्राथमिक जिल्हा परिषद नांदेड यांनाही माहितीसाठी पाठवण्यात आल्या आहेत.




मिळालेल्या माहितीनुसार, शाळेचे विद्यमान मुख्याध्यापक आपल्या कर्तव्यात कमालीची कसूर करत असून ते आठवड्यातून अनेक दिवस विनापरवाना शाळेत गैरहजर राहत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. एखादा पालक आपल्या पाल्याच्या शैक्षणिक अडचणीसाठी किंवा शालेय कामासाठी संपर्क साधण्याचा प्रयत्न केल्यास ते पालकांचे फोन उचलत नाहीत आणि प्रत्यक्ष भेटीसाठी गेल्यास उद्धटपणे वागून भेट नाकारतात, असा आरोप मनविसेच्या वतीने करण्यात आला आहे.

मुख्याध्यापकाची ही मनमानी आणि आडमुठी भूमिका केवळ शिस्तीचे उल्लंघन करणारी नसून, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्याशी खेळ मांडणारी आहे. शाळेचा दर्जा टिकवणे आणि शिस्त लावणे ही मुख्याध्यापकाची प्राथमिक जबाबदारी असताना, येथे स्वतः मुख्याध्यापकच नियमांचे उल्लंघन करून शिक्षणाचे नुकसान करत असल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

या संदर्भात बोलताना मनविसेचे माहूर तालुका अध्यक्ष गजानन कुलकर्णी म्हणाले की, मुख्याध्यापकाच्या या बेजबाबदार कारभाराला आता सर्व पालक वर्ग आणि शाळा व्यवस्थापन समिती पूर्णपणे कंटाळलेली आहे. अशा कर्तव्यशून्य व्यक्तीची या पदावर राहण्याची कोणतीही नैतिकता उरलेली नाही. त्यामुळे प्रशासनाने या मागणीची गांभीर्याने दखल घेऊन सदर मुख्याध्यापकाची या ठिकाणावरून तात्काळ बदली करावी आणि त्यांच्या जागी एखाद्या कर्तव्यदक्ष, शिस्तप्रिय व पालकांशी सुसंवाद राखणाऱ्या नवीन मुख्याध्यापकाची नियुक्ती करावी. जर प्रशासनाने यावर त्वरित कारवाई केली नाही, तर महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेना समस्त पालक वर्गाला सोबत घेऊन शिक्षण विभागाच्या विरोधात तीव्र आंदोलन छेडेल आणि याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची असेल, असा इशाराही यावेळी देण्यात आला. निवेदन देतेवेळी शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य पालक उपस्थित होते.

# सहकाराचा 'नंदादीप' आणि शेतकऱ्यांचा 'आधारवड' : मारोतराव पाटील कवळे गुरुजींच्या सेवायज्ञाची प्रेरणादायी गाथा



* आत्ताच एक्सप्रेस
**सुमन पोलशेटवार**

**उमरी –** ग्रामीण विकासासाठी केवळ राजकीय सत्ता नव्हे तर दूरदृष्टी, प्रामाणिक नेतृत्व आणि समाजाप्रती निष्ठा आवश्यक असते. या तिन्ही गुणांचा संगम घडवत मारोतराव पाटील कवळे गुरुजी यांनी आपल्या कार्यातून संपूर्ण परिसराच्या विकासाला नवे दिशा दिले आहेत. ''माझा शेतकरी प्रगत आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम झाला पाहिजे,'' हा त्यांचा केवळ नारा नसून आयुष्यभराचा ध्यास आहे. शिक्षक म्हणून सुरू झालेला प्रवास आज सहकार, शिक्षण, शेती आणि समाजसेवा या क्षेत्रांतील व्यापक परिवर्तनाचा आधारस्तंभ ठरला आहे.

**शेतकरी केंद्रस्थानी ठेवून विकासाची वाटचाल**

कवळे गुरुजींनी उभे केलेले साखर कारखाने हे केवळ उत्पादन केंद्र नसून शेतकऱ्यांच्या आर्थिक स्वातंत्र्याचे प्रतीक बनले आहेत. ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या घामाला योग्य मोबदला मिळावा, त्यांच्या घरात स्थैर्य आणि समृद्धी यावी यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. त्यांच्या दृष्टीने सहकार म्हणजे शेतकऱ्याच्या जीवनमान उंचावण्याचे साधन आहे.

**जलसंधारणातून शाश्वत शेती**

पाण्याचे महत्त्व ओळखून त्यांनी स्वखर्चातून कोल्हापुरी पद्धतीचे बंधारे उभारले. यामुळे परिसरातील भूजल पातळी वाढण्यास मदत झाली असून शाश्वत सिंचनाचा मार्ग खुला झाला आहे. पर्यावरण संतुलन राखण्यासाठी मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करून त्यांनी निसर्गसंवर्धनाचाही आदर्श घालून दिला.

**सहकारातून आर्थिक क्रांती**

शेतकऱ्यांना सावकारी कर्जाच्या विळख्यातून मुक्त करण्यासाठी त्यांनी पतसंस्थेचे मजबूत जाळे उभे केले. आज २० शाखांमार्फत गरजू शेतकरी आणि ग्रामीण नागरिकांना सुलभ व विश्वासार्ह कर्जपुरवठा केला जात आहे.

**युवकांना रोजगार आणि स्वावलंबन**

उद्योग समूहाच्या माध्यमातून हजारो युवकांना रोजगार उपलब्ध करून देण्यात आला आहे. बेरोजगार तरुणांना व्यवसाय सुरू करण्यासाठी पतसंस्थेमार्फत अर्थसहाय्य दिले जात असून स्वावलंबनाची नवी दारे खुली होत आहेत.

**महिला सक्षमीकरणाची चळवळ**

महिला बचत गटांची स्थापना करून त्यांना गृहउद्योगासाठी कर्जासोबत प्रशिक्षण व मार्गदर्शन दिले जात आहे. परिणामी ग्रामीण भागातील महिलांमध्ये आर्थिक स्वावलंबनाची भावना बळकट झाली आहे.

**शिक्षणातून भविष्य घडविण्याचा ध्यास**

स्वतः शिक्षक असल्याने गुरुजींनी शिक्षण क्षेत्रालाही प्राधान्य दिले. ग्रामीण विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षण घेऊन स्पर्धात्मक जगात टिकावे यासाठी त्यांनी शैक्षणिक संस्थांची उभारणी केली. या संस्थांमधून हजारो विद्यार्थी घडत असून ज्ञान आणि विज्ञानाची सांगड घालणारी शिक्षणव्यवस्था निर्माण होत आहे.

**सामाजिक बांधिलकीची परंपरा**

संकटकाळात मदतीला धावून जाणे, सामाजिक उपक्रमांना विधायक दिशा देणे आणि राजकीय मतभेद बाजूला ठेवून समाजकार्य करणे हा त्यांचा स्वभाव आहे. यामुळेच जनमानसात त्यांच्याविषयी विशेष आदर आणि विश्वास निर्माण झाला आहे.

मारोतराव पाटील कवळे गुरुजी म्हणजे शिस्तबद्ध शिक्षण, पारदर्शक सहकार आणि कळकळीची समाजसेवा यांचा त्रिवेणी संगम होय. शून्यातून विकासाचा पाया घालत त्यांनी ग्रामीण भागाला आर्थिक व सामाजिक बळ दिले आहे.

''शेतकरी सुखी तर जग सुखी'' या मंत्राचा ध्यास घेत त्यांनी उभारलेला विकासाचा मार्ग येणाऱ्या पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंडे यांनी फाईन प्रिंट, १४०७०, खोकडपूरा, औरंगाबाद ४३१००१ (महाराष्ट्र), येथे छापून लक्ष्मी ऑफसेट, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्या जवळ, रेल्वे स्टेशन रोड, परभणी जि.परभणी-४३१४०१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. मुख्य कार्यालय ०२४०-२४७४८१३ * **संपादक - सुग्रीव सोपानराव मुंडे** मो.9421281078, RNI.No.MAH/MAR2014/56289

The Printer, Owner & Publisher Sugriv Sopanrao Munde Fine print,14070,khokadpura, Aurangabad-431001 (M.H.) Laximi offset,Near Dr.babasahen ambedkar,statue,station road, parbhani Dist. Parbhani-431401.(edition editor Laximikan mundhe) (cheif Editor - Sugriv Sopanrao Munde) Office Ph. : 0240-2474813